## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 14/03/2019 (गुरूवार)
## (सकाळ)

---

### अवैधरीत्या घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत मौजा टिचर कॉलनी, कोंढाळी येथे दिनांक 13/03/2019 चे 02.15 वा. ते 02.45 वा. दरम्यान यातील आरोपी नामे – 1) क्षितीज सुरेश नानवटकर, वय 20 वर्ष, रा. पारडी रोड बिडगाव नागपुर, 2) आकाश उर्फ कैलास अण्णा सोमकुवर, वय 25 वर्ष, रा. नंदनवन किडवे कॉलेजजवळ, नागपुर ह.मु. भांडेवाडी पारडी नागपुर, 3) आकाश विलास लांजेवार, वय 19 वर्ष, रा. शास्त्रीनगर जुना बगडगंज, शास्त्रीनगर शाळा नागपुर, 4) हरिश अरूण वरडे, वय 28 वर्ष, रा. नंदनवन झोपडपटटी, शितला माता मंदीर जवळ, नागपुर व विधीसंघर्ष बालीका सर्व आरोपी एमएच– 49/ 8940 होन्डा पॅशन प्रो मोटरसायकल, एमएच– 49/बीसी– 7456 क्रमांकाच्या होन्डा डिओ व विना नंबरची होन्डा डिओ गाडीवर स्वत: जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात दोन तलवारी एक लोखंडी रॉड घेवुन फिरतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन दोन तलवारी एक लोखंडी रॉड अंदाजे कि. 2,050/–रू., तिन मोटरसायकल कि. 1,10,000/–रू. व 4 मोबाईल असा एकुण 1,53,050/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस नाईक श्री. मंगेश धरपुरे, पोस्टे. कोंढाळी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम 399, 402 भादवी., सहकलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. गव्हाणे हे करीत आहेत.

### चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 08 कि.मी अंतरावर मौजा लोणखैरी येथे दिनांक 13/03/2019 चे 01:30 वा. ते 02:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविन्द्र नेउलाल पटेल, वय 33 वर्ष, रा. वार्ड क्र. 01 जिल्हा परिषद शाळेजवळ, लोणखैरी याला दारू जास्त झाल्याने रोडच्या बाजुला तो झोपला होता. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे खिश्यातील एम.आय नोट कंपनीचा मोबाईल कि. 7,000/–रू., नगदी 700/–रू. व एमएच– 40/1466 क्रमांकाची मोटरसायकल सी.टी.डॉन कंपनी अंदाजे कि. 14,000/–रू. चा असा एकुण कि. 21,700/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गुरूप्रकाश मेश्राम हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर